Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## २९/९/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून आजपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला. आज दि.२९ सप्टेंबर २०२१ रोजी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी, एम.एस.डब्ल्यू, एम.सी.ए. इ. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा तसेच काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्रपरीक्षा दि. १६ सप्टेंबर २०२१ पासून सुरु झाल्या आहेत. आज दि. २९ सप्टेंबर २०२१ रोजी बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या अभ्यासक्रमाच्या पुनर्रपरीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

आजच्या या पुनर्परीक्षेसाठी ११४७९ विद्यार्थ्यापैकी १०६९० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

**आज दि.२९ सप्टेंबर २०२१ रोजी खालील एकुण १३ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले व आजपर्यंत एकुण ३४९ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बी.एस्सी./एम.एस्सी. नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी सेमि. १० | २ | ब्रिज कोर्स इन ड्रामॅटिक्स |
| ३ | एम.एड. सेमि. — ३ व ४ | ४ | एम.आर.एस. — सेमि. — ३ व ४ |
| ५ | एम.बी.ए. — सीबीसीएस — सेमि. ३ व ४ | ६ | डिप्लोमा इन क्लासिकल म्युझिक — व्होकल — भाग — १ व २ |
| ७ | डिप्लोमा इन क्लासिकल डान्स — भरतनाटयम — भाग — १ | ८ | डिप्लोमा इन क्लासिकल डान्स — कथक — भाग — १ |

तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.